# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## पुणे विभागीय मंडळ, पुणे. ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE DIVISIONAL BOARD, PUNE- 411 005

| DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF) | DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 25536712 (OFF) | E-MAIL - sscboardpune@gmail.com |
|---|---|---|


**महत्वाचे / परीक्षा प्राधान्य**

क्रमांक पुविमं/डीपी/ 5509
पुणे. ४११००५
दि. 16/06/2025

प्रति,

सर्व परिरक्षक,
जिल्हा - पुणे / अहिल्यानगर / सोलापूर.

**विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) जून-जुलै २०२५ परीक्षेसाठी सहाय्यक परिरक्षक (रनर) यांची माहिती सादर करणे व रनरने करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

**संदर्भ :- मा. राज्य मंडळ कार्यालयाचे क्रमांक/रा.मं/परीक्षा-८/२११८ दिनांक १३.०६.२०२५**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा दिनांक २४/०६/२०२५ ते १६/०७/२०२५ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा दिनांक २४/०६/२०२५ ते ०८/०७/२०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे.

सदर परीक्षा कालावधीत परिरक्षण केंद्रावरुन मुख्य परीक्षा केंद्रापर्यंत प्रश्नपत्रिकांचे वितरण करणे, परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका व अनुषांगिक साहित्य मुख्य परीक्षा केंद्रापासून परिरक्षण कार्यालयात पोहोच करणे तसेच परीक्षेदरम्यान बैठे पथक म्हणून कामकाज पाहणे यासाठी प्रत्येक मुख्य परीक्षा केंद्रासाठी एक सहाय्यक परिरक्षक (रनर) ची नेमणूक आपल्यामार्फत करण्यात यावी. तसेच नियुक्त केलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) ची माहिती खालीलप्रमाणे नमून्यात या कार्यालयास सादर करावी.

| अ.क्र | केंद्र क्रमांक | केंद्राचे नाव | सहाय्यक परिरक्षक (रनर) चे नाव | कार्यरत असलेल्या शाळा / क.म.वि चे नाव | हुद्दा | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

जून-जुलै २०२५ च्या परीक्षेवेळी इ. १२ वी व इ. १० वी परीक्षेच्या सर्व परीक्षा केंद्रावर सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिकांचे वाटप झाल्यानंतर सदर परीक्षा केंद्रावर शिल्लक राहिलेल्या प्रश्नपत्रिका व गैरहजर (Absent) असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिका पर्यवेक्षकाकडून तात्काळ जमा करुन घेवून केंद्रसंचालक व सहाय्यक परिरक्षक (रनर) यांच्या स्वाक्षरीने Block निहाय सीलबंद करुन केंद्रसंचालकाचे कस्टडीमध्ये ठेवत असतानाचे चित्रीकरण करावे. यामध्ये हलगर्जीपणा दिसून आल्यास रनर व केंद्रसंचालक यांना संयुक्तपणे जबाबदार धरले जाईल.

तसेच या पत्रासोबत परिरक्षक व सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचेसाठी आदर्श कार्यपध्दती बाबत च्या सूचना देण्यात येत आहे. या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

16.06.25

(डॉ. माधुरी सावरकर),
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे. ४११००५

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी -**

१. शिक्षणाधिकारी (माध्य.), पुणे / अहिल्यानगर / सोलापूर- यांनी आपल्या स्तरावरुन संबंधितांना कळवावे.